**पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण**
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दि. : ०९/१२/२०२४

## वावी गावातील मोटर सायकलचे शोरुम फोडणारे सराईत गुन्हेगारास स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक

---

दि.०२/११/२०२४ रोजी दिपावली पाडव्याच्या दिवशी सिन्नर शिर्डी महामार्गावर वावी गावचे शिवारात कोणीतरी अज्ञात चोरटयांनी भारत ॲटोमोबाईल नावाचे हिरो कंपनीचे मोटर सायकलचे शोरुम दुकानाचे बंद शटरचे कडी कोयंडा तोडुन अनधिकृतपणे आत प्रवेश करून ०३ नवीन होंडा स्प्लेंडर मोटर सायकल व एक्साईड कंपनीच्या बॅट-या असा एकुण २,३५,१७८/- रू. किंमतीचा मुद्देमाल घरफोडी चोरी करून चोरून नेला होता. सदर बाबत वावी पोलीस ठाणेस गुरनं ४४०/२०२४ भा.न्या.सं. कलम ३०५(अ), ३३१(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.विक्रम देशमाने व अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथक जिल्हयातील मालाविरूध्दचे नाउघड गुन्हयांचा समांतर तपास करीत आहे. त्यानुसार स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांनी वरील गुन्हयाचे समांतर तपासात आरोपींचे गुन्हा करण्याचे पध्दतीवरून गोपनीय माहिती घेतली असता, यातील आरोपी हे सिन्नर शहरात असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. त्यावरून स्थागुशाचे पथकाने सिन्नर शहरातील शंकरनगर परिसरात सापळा रचुन सराईत गुन्हेगार नामे **प्रदिप संजय रॉय, वय २४, रा. महालक्ष्मी कॉम्प्लेक्स,शंकरनगर, सिन्नर, ता. सिन्नर** यास ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेवुन चौकशी केली असता, त्याने गत महिन्यात सिन्नर शिर्डी महामार्गावर वावी गावचे शिवारात एक मोटर सायकलचे शोरुम फोडून मोटर सायकली चोरी केल्याची कबुली दिली आहे.

सदर आरोपी **प्रदिप संजय रॉय** यास वावी पोलीस ठाणेकडील वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून मा. न्यायालयाने त्याची दोन दिवस पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केली आहे. सदर आरोपीचे कब्जातुन वरील गुन्हयात चोरून नेलेल्या **०३ नवीन हिरो स्प्लेंडर मोटर सायकल किं.रू. २,३०,१७८/- चा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आलेला आहे. यातील आरोपी प्रदिप रॉय हा सराईत गुन्हेगार असुन त्याचेकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे, त्याचेविरूध्द दाखल गुन्हयांची माहिती खालील प्रमाणे ..

१) MIDC सिन्नर पो.स्टे. गुरनं २८८/२०२३ भादवि कलम ३८०,४५७,५११
२) MIDC सिन्नर पो.स्टे. गुरनं २८६/२०२३ भादवि कलम ३९९,४०२

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांनी गुन्हे उघडकीस आणण्यासाठी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, सपोनि संदेश पवार, पोलीस अंमलदार नवनाथ सानप, विनोद टिळे, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम यांचे पथकाने वरील घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.